Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# भारतीय बेरोजगारीः एक सामाजिक समस्या

**डॉ. सुधाकर शामराव गिरे**
प्राचार्य आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आर. वाय. पी. महाविद्यालय विहामांडवा.
ता. पैठण, जिल्हा औरंगाबाद

## प्रस्तावना

बेरोजगारी ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. ही समस्या फक्त भारतासमोरच आहे असे नव्हे तर संपूर्ण जगातील अर्थव्यवस्थांना भेडसावणारी समस्या आहे. आर्थिक दृष्टया मागासलेलया तसेच विकसनशील देशामधील ही गंभीर व मुलभूत समस्या आहे. ही समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत आहे. जसजशी लोकसंख्या वाढते. तसतशी बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत आहेबेरोजगारी ही विशेषतः अविकसित देशातील एक महत्वाची समस्या बनली आहे. भारतासारख्या विकसनशील देशालासुद्धा हया समस्येच्या घोर चिंतेने झपाटलेले आहे. एकीकडे शैक्षणिक सुविधा वाढत आहेत तर दुसरीकडे सुशिक्षित बेकारांची संख्यासुद्धा झपाटयाने वाढत आहे. त्यातूनच नैराश्य वाढते. वास्तविक राष्ट्रात प्रचंड संख्येने निराश युवक असणे ही सर्वात क्लेशदायक व दुदैवी बाब आहे. पदवीचे भेंडोळं हातात घेऊन नोकरीच्या शोधार्थ युवकांची भटकंती सुरु होते तेव्हा त्यांच्या असं लक्षात येतं की नोकरीच्या शोधार्थ निघालेल्यांची बाजारपेठेत एकच भाऊगर्दी झालेली आहे. मागणीपेक्षा, अशी ही परिस्थिती, वारंवार एखादया उमेदवाराला नकारच मिळत राहिला तर त्याची स्वतःवरील श्रद्धा उडते. तो आत्मविश्वास गमावतो. ते एक विपन्नावस्थेचं मूर्तीमंत चित्र बनते

मध्यंतरी मंदीची लाट जगभरात येऊन गेली. आपल्या देशाचे आर्थिक नियोजन आणि भक्कम पाया असलेली अर्थव्यवस्था यामुळे सुदैवाने आपल्याला त्या मंदीची फार मोठी झळ सोसावी लागली नाही. परंतू तरीही आपल्या देशात आणि राज्यात अनेकांवर बेकारीची कु—हाड कोसळल्याच्या बातम्या आपल्याला वाचायला मिळाल्या. त्यातल्या काहींना चांगल्या पगाराच्या नोक—या असल्यामुळे मोठी गृहकर्ज घेतली होती. त्यांचे भलेमोठे हप्ते फेडायचे कसे या विचाराने त्यांच्यावर आभाळच कोसळलं होतं. ज्यांचे पगार मोठे नव्हते अशांनाही घर कसं चालवायच या चिंतेने ग्रासले होते. एकूणच काय, तर सर्वांवरच कुठल्या ना कुठल्या प्रकारे आर्थिक संकट कोसळतील. प्रामुख्याने नोकरीत आणि त्यातही खाजगी क्षेत्रामधल्या नोक—यांमध्ये आता काहीशी अनिश्चितता वाढत चालली आहे. त्यातच नोक—यांमध्ये आर्थिक स्थैर्य लाभतं, ही गोष्ट जितकी खरी आहे. तितकंच हे ही खरं आहे की, नोकरी गेली आणि लगेच दुसरी मिळाली नाही तर लगेचच पैशांचा स्त्रोत कसा उभा करायचा हा प्रश्न असतो म्हणजेच थोडक्यात काय तर आर्थिक परावलंबित्वामुळे बसलेली आर्थिक घडी विस्कटली तर

आयत्यावेळी असहाय्यतेची भावना मन ग्रासून टाकते आणि मग नैराश्यवादी टोकाच्या भूमिका माणसं घेतात. त्यामुळे तहान लागल्यावर विहीर खोदण्याऐवजी आधीपासूनच आपला रोजगार जर आपणच निर्माण केला तर आपलं आर्थिक स्वातंत्र्य जपलं जाऊ शकतं कुठलाही व्यवसाय हा एकटयान कोणाच्याही मदतीशिवाय होऊ शकत नाही. म्हणजेच आपण आपल्यासाठी जेव्हा रोजगार निर्माण करतो तेव्हा आपण इतर अनेकांसाठीही रोजगार निर्माण करत असतो अर्थातच एका दिव्याने जसे अनेक दिवे पेटत जातात तसा एक उद्योजक अनेक जणांना उद्योगधंदा उपलब्ध करून देतो आणि अश्या प्रकारे फार मोठया प्रमाणात देशाची उत्पादकता वाढून संपूर्ण देशच आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होतो. देशाच सार्वभौमत्व आणि अखंडता राखायची असेल तर सगळया क्षेत्रामध्ये देश स्वयंपूर्ण असणं गरजेचे आहे. उद्योजकता ही एक प्रकारे देशसेवाच आहे.

**बेरोजगारीचा अर्थ–**

बेरोजगारी म्हणजे प्रचलित वेतनावर जेव्हा एखादया व्यक्तिची काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही अशा व्यक्तिला काम मिळत नसेल तर त्याला बेरोजगार असे म्हणतात भारतातील बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड आहे व ते सतत वाढत आहे. भारतात सन 1901 मध्ये बेरोजगारांची संख्या काम मागणाऱ्यापैकी 71 लाख होती. सन 1993 मध्ये बेरोजगारांची संख्या 3.62 कोटी इतकी वाढली. या 32.33 वर्षात ही बेरोजगारी 500 टक्क्यांनी वाढलेली होती. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार भारतील बेरोजगारांची संख्या 10 कोटी पेक्षा अधिक झालेली आहे.

**भारतातील बेरोजगारीचे स्वरूप–**

बेरोजगारी किंवा बेकारी या समस्येचे स्वरूप काळानुसार बदलणारे आहे. भारतासारख्या विकसनशील देशात उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचा पर्याप्त वापर केला न गेल्यामुळे बेरोजगारी निर्मांण होते. बेरोजगारीची अवस्था म्हणजे देशातील लोकांना आपल्या मुलभूत गरजा पूर्ण न करता येणारी अवस्था असते. केन्सच्या मते बेरोजगारीचे मुळ कारण म्हणजे प्रभावी मागणीची कमतरता असणे होय व त्यामुळे श्रमिकांची मागणी कमी होते. कारण मागणीची कमतरता असणे होय व त्यामुळे श्रमिकांची मागणी कमी होते. कारण मागणीच्या अभावामुळे उत्पादनात घट होते व परिणामतः बेकारी वाढते. भारतात 1929 च्या महामंदीमुळे आर्थिक व्यवहारांमध्ये उच्च स्तरावरील बदल झाल्यामुळे बेरोजगारी उत्पन्न झाली होती.

**बेरोजगारीची कारणे–**

भारतातील बेरोजगारी हा सुद्धा एक सामाजिक प्रश्न आहे. बेरोजगारी निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत. ही कारणे ग्रामीण व शहरी क्षेत्रानुसार विभिन्न आहेत. म्हणून ग्रामीण बेकारी व शहरी बेकारीची कारणे अभ्यासणे आवश्यक आहे

अ. शहरी बेकारी निर्माण होण्याची कारणेः—

1. अयोग्य शिक्षण पद्धतीः—

भारतात मेकॉलेच्या काळात सुरू झालेल्या शिक्षण पद्धती आजही सुरू आहे. अशी शिक्षण पद्धती फक्त कारकुण निर्माण करतेमहाविद्य ालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडतात. यातील सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे शहरी बेकारी वाढते.

2. श्रमदलात झालेली वाढः—

भारतात लोकसंख्या वाढीचा दर सरासरी वार्षिक 2ः आहे. सन 2001 ते 2011 या दहा वर्षाच्या काळात भारताची लोकसंख्या 18 कोटींनी वाढली. म्हणजेच दरवर्षी 1.5 कोटींनी लोकसंख्या वाढते. लोकसंख्या वाढल्यामुळे काम मागण्याऱ्याची संख्या वाढत जाते. परंतु वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार निर्माण करणे शक्य होत नाही परिणामतः बेकारी वाढते.

3. ग्रामीण लोकांचे स्थलांतरः—

भारतातील ग्रामीण भागात शेतीक्षेत्राशिवाय रोजगाराचे दूसरे साधन नाही. शेतीचे हंगामी स्वरूप, तुकडीकरण अशा अनेक कारंणामुळे शेती परवडेनाशी झालेली आहे. शेतीक्षेत्रात रोजगार शाश्वतीचा उपलब्ध होत नाही व शेतीत कमी मजूरी मिळते. तसेच ग्रामीण भागात दुष्काळ पडतो, तर कधी अतिवृष्टी होते. त्यामुळे खेडयात अनिश्चितता असते. त्यामुळे उत्पन्न रोजगारासाठी ग्रामीण भागातील लोक शहराकडे स्थलांतर करतात आणि शहरात स्थायिक होतात. एक व्यक्ति शहरात आली की तिच्यामागे अनेकजण शहरात येतात. रोजगारासाठी शहरात स्पर्धा वाढते. परिणामी बेकारी वाढते.

4. औद्योगिकरणाची मंद गतीः—

भारतात औद्योगिकरणाचा वेग संध्या मदांवलेला आहे. तसेच मोठमोठया उद्योगांमध्ये स्वयंचलित अवजड यंत्रांचा वापर करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. संगणकीकरण, यांत्रिकीकरण केल्यामुळे शहरी बेकारीत वाढ होत. त्याचप्रमाणे भारतात आर्थिक सुधारण सुरू केल्यामुळे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (खाऊजा) प्रक्रिया वेग घेत आहे. यात एक्झिट पॉलिसी, हायर अ‍ॅड फायर निती स्विकारल्याने अनेक लोकांना बेकार व्हावे लागते. स्वेच्छा निवृत्ती योजना ;टत्ैद्ध ही बेकारी निर्माण करणारी नविन प्रणाली देशात सुरू झालेली आहे.

5. औद्योगिक कलहः—

भारतात अनेक उद्योगांचे एकाच शहरात केंद्रिकरण झालेले आहे. अशा ठिकाणी प्रत्येक उद्योगात अनेक कामगार संघटना असतात. या संघटनावर राजकीय पक्षांचे वर्चस्व असते. कामगार संघटना व भांडवलदारी मालक वर्ग यांच्यात नेहमीच वेतन, बोनस, रजा व इतर सोयी सवलतींसाठी संघर्ष होतात. त्यामुळे संप टाळेबंदी व आंदोलने घडवून आणल्यामुळे उत्पादन ठप्प होते. परिणामी कारखाने, उद्योग बंद पडतात व बेकारी वाढते.

**6. तांत्रिक कौशल्याची कमतरता:–**

भारतात उद्योगासाठी लागणाऱ्या तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संख्या अत्यंत कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे या शिक्षणाभावी, कौशल्याभावी अनेक लोकांना रोजगार मिळत नाही. त्याचप्रमाणे भारतात उद्योगांमध्ये भांडवलप्रधान तंत्राचा वापर वाढलेला दिसून येतोआधुनिकीकरण, वाजवीकरण, स्वयंचलिकरण, उदारीकरण, खाजगीकरण तसेच जागतिकीकरण, परकीय भांडवलाला प्राधान्य अशा अनेक बाबींच्या प्रभावामुळे बेकारी वाढते

**अ. आर्थिक, सामाजिक व मानसिक कारणे:**

**1. श्रमिकाची गतिशिलता:–**

भारतातील श्रमिकांची गतिशिलता विदेशातंच काय देशातल्या देशात कमी आहे. आणि स्थानिक भागात उद्योगधंदे नसल्याने त्याला रोजगार मिळत नाही. परिणामत: बेकारी वाढते.

**2. समाजव्यवस्था: –**

भारतातील समाज हा अनेक जाती व पंथांचा बनलेला आहे. राजकीय स्वार्थामुळे आरक्षण दिले जाते. परंतू अनेक ठिकाणी नियमाप्रमाणे आरक्षित जागेवर खुल्या गटातील लोक काही ठिकाणी भरले जातात. त्यामुळे क्षमता पात्रता असूनही अनेकांना बेकार रहावे लागते. म्हणजेच नियमांची पायमल्ली केली जाते.

**3. आर्थिक व सामाजिक परिस्थिती: –**

शहरात सुद्धा अनेक लोक दारिद्रयरेशेखालील जीवन जगत असतात. त्यांना उच्च शिक्षण घेता येत नाही. त्याच प्रमाणे उद्योग-व्यवसायासाठी लागणारे कौशल्य क्षमता त्यांच्याकडे नसतात. आपणही काही नविन करावे असे त्यांना वाटत नाही. रूढी, परंपरा यांचा पगडा त्यांच्यावर असतो. वडिलोपार्जित व्यवसायच मुले करतात. आपला पिढीजात व्यवसाय सोडायला हे लोक तयार नसतात. त्यांचे हे व्यवसाय वर्तमान जगात चालत नसल्याने त्यांना बेकार रहावे लागते

**4. श्रमबाजाराचे असंघटित स्वरूप:–**

भारतात श्रमबाजाराचे स्वरूप असंघटीत आहे. त्यामुळे श्रमिकांना कामाची, मजूरीची, उद्योगांची माहिती उपलब्ध होत नाही. त्याचप्रमाणे काम पुरविणाऱ्यांना, उद्योजकांना, मजूर/कामगार कोठून उपलब्ध होतील हे वेळेवर समजत नाही. म्हणजेच कामगार–मालक यांच्यात समन्वय साधला जात नाही. याचा अर्थ श्रमाचा पुरवठा असूनही आवश्यकता असूनही बेकारी निर्माण होते

**ब. ग्रामीण बेरोजगारी निर्माण होण्याची कारणे:**

**1. वाढती लोकसंख्या:** – ग्रामीण भागातील लोकसंख्या शहराच्या तुलनेत वेगाने वाढते. निरक्षर, अंधश्रद्धाळू अज्ञानी लोकांना वाढत्या लोकसंख्येचा धोका निटपणे कळत नाही. जितकी जास्त मुले होतील तितकी शेतीकामासाठी उपयोग होतो अशी लोकांची समजूत असते.

परिणामतः लोकसंख्या वाढून रोजगार मागणाऱ्यांची संख्या वाढत जाते. त्या प्रमाणात देशात शहरी व ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होत नाही व बेरोजगारांची संख्या वाढत जाते.

2. शेतीचे हंगामी स्वरूपः—

भारतातील एकूण लागवडी खालील शेतीपैकी 70ः शेती पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असते. अनेक शेतकऱ्यांकडे जमिनीचे प्रमाण अल्प असते. लोकसंख्या वाढ व वारसाहक्क यामुळे शेतजमिनीचे तुकडे पडतात, त्याचप्रमाणे शेतीवर सर्व कुटूंब अवलंबून असते. शेतीची अल्पउत्पादकता तसेच 4 ते 5 महिनेच काम उपलब्ध असणे इ. कारणामुळे शेती परवडेनाशी झालेली असल्यामुळे शेतकरी शेतीपासून दूर जात आहेत. शेतीपडीक राहते. उत्पन्न व उत्पादन होत नाही.

3. शिक्षणाचा प्रसारः—

ग्रामीण भागात सुद्धा माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणाच्या सोयीसुविधा पुरविणाऱ्या संस्थांची वाढ झालेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या तरूण—तरूणींची संख्या वाढलेली आहे. हे शिक्षण कुचकामी आहे. ही तरूण मंडळी शेतातले व हलके काम करण्यास तयार होत नाही त्यांनाही शहरातील चांगल्या प्रकारची नोकरी/काम हवे असते. शहराचे आकर्षण असते. त्यामुळे काम न मिळाल्याने बेकारी वाढते.

4. दरिद्री अवस्थाः—

शेतकरी गरीब असल्याने तसेच कमी जमीन असल्यामुळे शेतीत योग्य त्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करू शकत नाही. त्याचप्रमाणे फावल्या वेळेत शेतीला पुरक/जोड व्यवसाय करू शकत नाही. कर्जपुरवठयाच्या सोयीसुद्धा कमी आहेत. कर्जपुरवठयासाठी जास्तदराने कर्जपुरवठा करणाऱ्या सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात. त्यामध्ये त्यांची शेती तारण असल्याने कर्जफेड करू न शकल्याने जमिनही हातची जाते व बेकार होण्याची पाळी येते.

5. अपूर्ण आर्थिक विकासः—

भारतात सुरू झालेला आर्थिक विकास हा शहरांपुरता मर्यादित असतो. आर्थिक विकासाचे फायदे ग्रामीण भागापर्यंत पोहोचत नाहीत. तसेच शासनाच्या रोजगार नियोजनाच्या अभावामुळे चुकीच्या धोरणामुळे बेरोजगारी वाढत जाते. देशात भांडवलनिर्मितीचा दर कमी आहे. ग्रामीण भागात अद्यापही बॅकीग सुविधांचा, रस्ते व दळणवळण सुविधांचा पाहिजे तेवढा विकास झालेला नाही

निष्कर्षः—

सरकारने कृषी, उद्योग व सेवाक्षेत्र या सर्वप्रकारच्या क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी. जेणेकरून या सर्व क्षेत्रांमध्ये रोजगार उपलब्ध होईल. जागतिकीकरण, खाजगीकरण व

उदारीकरण या सर्व प्रकियेत शासनाने आपला सहभाग कमी केलेला आहे. याउलट अमेरिकेने आपला सर्व क्षेत्रातला हस्तक्षेप वाढविला आहे. अमेरिकेसारखी मंदिची परिस्थिती भारतावर येऊ नये यासाठी भारतसरकारने सर्वक्षेत्रात आपली क्रियाशील भूमिका सुरू ठेवावी. हे लक्षात घ्यावे. अमेरिकेची लोकसंख्या फक्त 40 कोटी आहे व आपली 130 कोटीपर्यंत पोहोचलेली आहे. त्यामुळे रोजगार निर्माण करण्यासाठी सर्वक्षेत्रीय कामे सुरू करण्याची आवश्यकता आहे

## संदर्भ सूची

1. डॉ. प्रदिप आगलावे – संशोधन पद्धती व शास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
2. डॉ. सुधीर बोधनकर – सामाजीक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन 2013
3. डॉ. प्रभाकर देशमुख – उद्योजकता विकास, संकल्पना आणि व्यवहार, पिंपळापुरे अँड क. पब्लीशर्स, नागपूर.
4. डॉ. पी.के. कुलकर्णी – उद्योगाचे समाजशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.
5. प्रो.जे.के. जाधन उद्योग मार्गदर्शन, परिमल प्रकाशन.
6. भोसले के. एम् आणि कारे के. बी.– लोकसंख्या शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2006
7. मिश्रा एस्. के. आणि पूरी. व्ही. के.– इंडियन इकॉनॉमी, हिमालया पब्लिसिंग हाऊस, न्यू दिल्ली, 2008
8. दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2007 दास्ताने रामचंद्र आणि कंपनी , पुणे 2007
9. पाटील जे एफ्. इकॉनॉमिक पॉलिसीज ॲन्ड प्रोग्रॅम्स ऑफ राजर्षि छत्रपती शाहू महाराज, शिवाजी युनिव्हर्सिटी,2007.
10. जाधव तुकाराम–महाराष्ट्र वार्षिकी, 2008–09, द युनिक ॲकॅडम, पुणे.
11. सो. डी. ए. बी.– द मेगा स्टेट महाराष्ट्र (2005), निराली प्रकाशन, पूणे
12. सागर के. – कृषी विषयक घटक, के. सागर पब्लिकेशन, पुणे, 27 वी आवृत्ती, 2009
13. सावंत प्रकाश– महाराष्ट्राचा भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2002.
14. कुलकर्णी पी. बी.– डिस्टॉर्शन्स इन को– ऑपरेशन हिमालया पब्लिशींग हाऊस, मुंबई, 1991.